# तपशिलवार बस पास योजना

बेस्ट उपक्रमाने आपल्या प्रवाश्यांसाठी आरएफ-आयडी आधारित बस पास सादर केले आहेत. बेस्ट उपक्रमाच्या अधिकृत विक्री केंद्रावर बस पास दिला  जाईल. हया योजनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे. अंतरावर आधारित बस पास मूल्य (कि.मी. च्या आधारावर)

| कि.मी. | साधारण / मर्यादीत | | वातानुकुलित | |
|---|---|---|---|---|
| | मासिक | त्रैमासिक | मासिक | |
| | | | | |
| 2 | 360 | 1060 | 880 | |
| 4 | 440 | 1320 | 1100 | |
| 6 | 660 | 1980 | 1320 | |
| 8 | 800 | 2380 | 1540 | |
| 10 | 970 | 2910 | 1760 | |
| 12 | 1100 | 3300 | 1980 | |
| 14 | 1240 | 3700 | 2200 | |
| 17 | 1410 | 4230 | 2420 | |
| 20 | 1500 | 4490 | 2860 | |
| 25 | 1630 | 4890 | 3520 | |
| 30 | 1850 | 5550 | 4180 | |
| 35 | 2070 | 6210 | 4840 | |

## खालील तत्त्वांवर अंतर मोजले जाते:

- जर थेट मार्ग मूळ आणि गंतव्यस्थान दरम्यान अस्तित्वात असेल तर या दरम्यानच्या अंतराचा बस पासचे मुल्य निंश्चित करण्यासाठी विचारात घेतले जाईल.
- जर मूळ आणि गंतव्यस्थानामध्ये किमान एकापेक्षा अधिक थेट मार्ग विद्‌यमान असतील तर बस पास मूल्याची गणना करण्यासाठी  हया स्टॉप दरम्यान असलेले किमान अंतर विचारात घेतले आहे.

- जर मूळ आणि गंतव्यस्थान दरम्यान थेट मार्ग उपलब्ध नसेल तर

एका बदलासह (Change Over) चे अंतर मार्गाची गणना करताना विचारात घेतले जाईल. एकापेक्षा जास्त मार्गांच्या बाबतीत, बस पास मूल्य. ठरवताना एका बदलासह असलेले किमान अंतर बदलासह (Change Over) म्हणून गणना केली जाते. मूळ आणि गंतव्यस्थान दरम्यान कनेक्शनची अनुपलब्धता झाल्यास एक बदल (Change Over) करुन सुद्धा मूळ आणि गंतव्यस्थान दरम्यान कोणतिही सेवा उपलब्ध नसेल तर अंतर-आधारित बस पास दिला जाणार नाही. अशा परिस्थितीत, प्रवाशांना निश्चित रक्कमेचा पासची निवड करण्याचा सल्ला दिला जातो.

- जर बस प्रवर्तनात मागणीनुसार बदल असेल तर मूळ आणि

गंतव्यस्थानातील अंतर हे स्थिर राहणार नाही. अशा परिस्थितीत बस पासच्या मूल्यामध्ये वाढ किंवा घट होऊ शकते.

“ स्वेच्छेनुसार प्रवासा ” साठी बसपास

| ठरावीक मुल्य बसपास | दैनंदिन (रु.) | मासिक (रु.) | त्रैमासिक (रु.) |
|---|---|---|---|
| शहर विना वातानुकुलित | 50 | 1100 | 3300 |
| उपनगर विना वातानुकुलित | 60 | 1320 | 3960 |
| विना वातानुकुलित सर्वत्र | 90 | 1980 | 5940 |
| वातानुकुलित दैनंदिन बसपास | 200 | 4400 | |
| बालक शहर विना वातानुकुलित | 25 | | |
| बालक उपनगर विना वातानुकुलित | 30 | | |
| बालक मॅजिक विना वातानुकुलित | 45 | | |
| बालक मॅजिक वातानुकुलित | 100 | | |

टिपः

1. शहर विना वातानुकुलित बसपासः हा बसपास माहिम कोळीवाडा / माहिम शाहुनगर / धारावी “टी” जंक्शन / संत रोहिदास मार्ग / राणी लक्ष्मीबाई चौक (सायन)/ आणिक आगार दक्षीणेकडे पर्यंत वैध राहिल.

2. उपनगर विना वातानुकुलित बसपासः हा बसपास धारावी ‘‘टी’’ जंक्शन / संत रोहिदास मार्ग / राणी लक्ष्मीबाई चौक (सायन)/ वांद्रे (उत्तर), दहिसर चेकनाका / मुलुंड (पश्चिम) चेकनाका / आनंदनगर  मुलुंड (पूर्व) चेकनाका / ऐरोली चेकनाका / वाशी जकातनाक्या पर्यंत वैध राहिल.

3. शहर आणि उपनगर बसपासला धारावी ‘‘टी’’ जंक्शन / संत रोहिदास मार्ग / राणी लक्ष्मीबाई चौक (सायन)/ पिवळा बंगला पर्यंत परवानगी आहे.
4. मॅजिक विना वातानुकुलित बसपास (मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये) - हा बसपास मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये असणा-या संपुर्ण बसप्रवर्तनाच्या क्षेत्रामध्ये वैध राहिल.
5. मॅजिक विना वातानुकुलित बसपास (मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीपलीकडे) - हा बसपास संपुर्ण बसप्रवर्तनाच्या क्षेत्रामध्ये वैध राहिल.
6. मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीकरीता विनावातानुकुलितबस बसपास रुपये 50 आणि वातानुकुलितबस बसपास रुपये 100 प्रतिमहिना जादा आकारण्यात येईल.
7. प्रवाशी जर मुंबई महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये वैध बसपास धारण केल्याशिवाय प्रवास करताना आढळला तर सदर प्रवाशास विना तिकीट समजण्यात येईल आणि विदयमान कायदयानुसार त्यावर योग्य तो दंड आकारण्यात येईल.
8. वरीष्ठ नागरीकांसाठी बसपासः ज्यांनी वयाची 60 वर्षे पुर्ण केली आहेत अश्या वरीष्ठ नागरीकांना सदर मासिक बसपासेस रुपये 50/- आणि त्रैमासिक बसपास रुपये 200/- च्या सवलतीच्या दरात मिळतील. (फक्त अंतरावर आधारीत आणि विना वातानुकुलित बसपासेस)

<u>योजनेचे सामान्य नियम व विनियम:</u>

- बस पास इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील प्रमाणीत कार्ड (आरएफ-आयडी कार्ड)

असेल. सर्व बस पास फक्त रोख रकमेने निर्दिष्ट वेळे दरम्यान अधिकृत केंद्रावर दिले जातील.

- एकदा बसपाससाठी झालेली नोंदणी कोणत्याही परिस्थितीत रद्द /

हस्तांतरित / बदलले जाऊ शकत नाही.

- अंतरावर अधारीत बसपास प्रवाशांच्या मागणीनुसार त्यांच्या निवडीच्या
20 कि.मी. अंतरापर्यंत कोणत्याही दोन वैध गंतव्यस्थानांच्या दरम्यान दिला जाईल. प्रवाशी जास्तीत जास्त दोन प्रवासाच्या पर्याची निवड करू शकतो प्रत्येक प्रवासाचा पर्याय हा जास्तीत जास्त 20 किलोमीटरपर्यंत मर्यादीत राहील.
- आमच्या संपूर्ण बस प्रवर्तनाच्या क्षेत्रासाठी निश्चित रक्कमेचा बसपास
प्रवाशांना त्यांच्या मागणीनुसार दिला जाईल.
- अंतरावर आधारित बसपास केवळ सामान्य आणि मर्यादित सेवांवर वैध
आहेत. निश्चित रक्कम बस पास केवळ विशिष्ट श्रेणीच्या सेवांवर वैध आहेत.
- विद्यार्थ्यांना देण्यात येणारा सवलतीचा बसपास जलद तसेच
वातानुकुलीत बसमार्गावर वैध नाही.
- प्रवाशी 7 दिवस अगोदर बसपासचे नूतनीकरण करु शकतात. त्याच
प्रमाणे संपुर्ण महिन्याच्या कोणत्याही दिवशी बस पास वापरून त्याचा प्रवास सुरू करु शकतो. बसपासचा प्रारंभ महिन्याच्या कोणत्याही दिवशी असू शकतो.
- सर्व बसपास धारकांनी निवडलेल्या गंतव्यस्थाना दरम्यान उपलब्ध
असलेल्या थेट मार्गांवर, कितीहीवेळा प्रवास बदलाची परवानगी आहे. निवडलेल्या गंतव्यस्थानादरम्यान प्रवाशाला प्रवास संख्येचे कोणतेही बंधन राहणार नाही.

- ग्लोबल बसपासधारक वगळता पासधारकाला जर पासवर नमुदकेलेल्या
गंतव्यस्थानापलीकडे जायचे असेल तर त्याला नियमित तिकिट भाड्याच्या समान मुल्याचे विस्तारीत तिकीट बसवाहकाकडुन खरेदी करण्याची परवानगी दिली जाईल.
- जर बसपास धारक आपल्या सोबत शुल्क आकारण्यायोग्य सामान वाहून
नेत असल्यास प्रत्येक प्रवासासाठी त्यास सामान भाडे आकारण्यात येईल.

- रांगेशिवाय किंवा पुढील दरवाजाने बसमध्ये चढणे किंवा तत्सम प्रकारचे

प्राधान्य बसपास धारकांना दिले जाणार नाहि आणि त्यांना इतर तिकीटधारकांप्रमाणे नियमित तिकिटधारक समजण्यात येईल. परंतु उपक्रमाने दिलेले वरिष्ठ नागरिक ओळखपत्र धारण करणा-या वरिष्ठ नागरीकांना बसमध्ये पुढील दरवाजाने चढण्याची परवानगी आहे.

- ज्या नागरिकांनी 60 वर्षे पूर्ण केली आहेत अशी मुळकागदपत्रे दाखवून

ज्यात जन्मतारीखांचा उल्लेख केला जातो (पॅन कार्ड, आधार कार्ड, पारपत्र, उपक्रमाद्वारे जारी केलेले ओळखपत्र) अशा विरिष्ठ नागरीकांना " विरिष्ठ नागरीक सवलत " दिली जाते.

- बसपास धारक कुठल्याही कारणास्तव कोणत्याही दिवशी कोणत्याही

प्रवासाच्या किंवा त्यानी प्रवास न केलेल्या कोणत्याही दिवसाच्या प्रवासाच्या भागाच्या परताव्यासाठी पात्र धरला जाणार नाही.

- कोणत्याही परिस्थितीत बसपास हस्तांतरणीय नाही.

- बस पासचा दुरुपयोग झाल्याचे आढळून आल्यास सदर बसपास उर्वरीत रक्कम तसेच न वापरलेला कालावधी लक्षात न घेता कोणत्याही शुल्काशिवाय जप्त करण्यात येईल.

उपक्रमाने प्रमाणित केलेल्या यंत्राव्दारे वाचण्यायोग्य नसल्यास सदर बस पास अवैध म्हणून मानला जाईल.

- वैध बसपासाशिवाय प्रवास करणा-या बसपास धारकास विना तिकीट

प्रवाशी मानले जाईल आणि असा प्रवाशी विदयमान नियमानुसार दंडासाठी जबाबदार असेल.

- बसपास खराब / दोषपूर्ण झाल्यास त्यास जुन्या खराब / दोषपूर्ण बस पास

परत करुन नवीन बस पास देण्यात येईल त्यासाठी लागणारे शुल्क प्रवाशास दयावे लागेल जुन्या बसपास वरील वैधता कालावधी उर्वरित वैधता कालावधीपेक्षा 15 दिवसापेक्षा अधिक असल्यास नवीन बस पासवर तो दिला जाईल.

- बसपास गहाळ झाल्यास, प्रवाशाला बसपासची दुय्यम प्रत दिली जाईल

त्या साठी लागणारे शुल्क प्रवाशाला भरावे लागेल हरवलेल्या बस पासची वैधता कालावधी बसपासच्या दुय्यम प्रतीवर चालु राहिल. त्यासाठी प्रवाशाने 1) पोलीस तक्रार 2) फोटो ओळख पुरावा, आणि 3) उपक्रमाने दिलेली मुळ पावती सादर करणे आवश्यक आहे.

उपक्रमाद्वारे देण्यात येणारा बसपास म्हणजे शाश्वत बससेवेची हमी

देण्याचे कोणतेही आश्वासन नाही आणि अनियमित प्रवर्तन, संप, बससेवा काढुन टाकणे, युद्ध, बस गाडयांमध्ये बिगाड, नैसर्गिक आपत्ती इ. साठी कोणताही प्रकारचा दावा देत नाही.

- नव्याने देण्यात येणारा बसपास / नूतनीकरणासाठी प्रत्येक वेळी प्रशासकीय शुल्क रुपये 10/- प्रती महिना आकारले जाईल.

- देण्यात येणारे आरएफ-आयडी कार्ड बेस्ट उपक्रमाची मालमत्ता असेल.

नवीन देण्यात येणा-या आरएफ-आयडी कार्डावर एकदाच शुल्क रुपये 30/- प्रवाशांना आकारण्यात येईल.

<u>विद्यार्थ्यांसाठी सवलत बस पास खालील निकषांवर आधारित आहेतः</u>

1. एसएससी पर्यंत अभ्यास करणारे किंवा 20 वर्षे वयापर्यंत.
2. एचएससी / डिप्लोमा पर्यंत अभ्यास करणारे किंवा 22 वर्षे वयापर्यंत.

बस पाससंबंधी कोणत्याही बाबी / विवादाचा निर्णय महाव्यवस्थापकांचा किंवा त्यांनी हया कामासाठी अधिकृत केलेल्या अधिका-यांनी दिलेल्या निर्णयाने ठरविला जाईल.

- महाव्यवस्थापकांना सदर योजनेच्या नियम आणि अटींमध्ये बसपास
धारकास कोणतीही आगाऊ सुचना न देता कोणत्याही प्रकारची वाढ करणे / कमी करणे / दुरुस्त करण्याचा अधिकार आहे. आणि बदलण्यात आलेले नियम व अटी बसपास धारकास बंधनकारक राहतील.

- बेस्ट प्रशासन बसपासची योजना कोणतीही पूर्वसूचना न देता मागे घेऊ
शकते किंवा बंद करु शकते किंवा बदलू शकते तथापि, अग्रगण्य वर्तमानपत्रांमधुन पासधारकांना त्या बाबतची माहिती दिली जाईल.

<u>प्रवाशांसाठी मार्गदर्शक तत्वेः</u>

<u>पीओएसवर बस पासच्या मुदतीची प्रक्रिया खालील प्रमाणे आहे:</u>

1. कृपया जवळच्या विक्री केंद्राला (पॉईंट ऑफ सेल) ला भेट द्या.
2. विक्री केंद्रावर उपलब्ध असलेल्या अर्जासोबत आवश्यक तपशिल सादर करा आणि प्रतिनिधीकडे जमा करा.
3. प्रतिनीधी विक्री केंद्रावर छायाचित्र काढण्याची व्यवस्था करील.
4. प्रवाशाला छायाचित्र सादर करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. विक्री केंद्राला जर प्रवाशी भेट देऊ शकत नसेल तर हया सुविधेचा उपयोग करुन घेऊ शकतात.
5. प्रवाश्याला आवश्यक असलेल्या बस पासचे प्रकार सांगण्याची आवश्यकता आहे जेणेकरुन प्रतिनीधीला लागू होणा-या शुल्काची गणना करता येईल. शुल्कामध्ये आरएफआयडी कार्डाचे मुल्य, योग्य ते प्रवास भाडे आणि प्रशासकीय शुल्क चा समावेश राहिल.
6. प्रवाश्याकडून पुष्टी झाल्यास, देय रक्कम प्रतिनीधीव्दारे गोळा केली जाईल आणि त्याची अस्थायी पावती देण्यात येईल. प्रवाशांना सदर विक्री केंद्रावर त्यावरील तपशील आणि नवीन आरएफ-आयडी कार्ड प्राप्त करण्याची देय तारीख तपासणे आवश्यक आहे.
7. जेथे छायाचित्र काढले आहे / जमा केले आहे अशा विक्री केंद्रावर देय दिनांका दिवशी प्रवाशांना अस्थायी पावती जमा करणे आवश्यक आहे.

8. निवडलेल्या बसपासच्या पर्यायाप्रमाणे बसपास कार्यान्वित करण्यात

येईल. आणि प्रवाशास अंतिम पावतीसह तो देण्यात येईल.

.

9. प्रवाश्याने बसपासचा तपशील विक्री केंद्रावर बसविलेल्या मशीनवर तपासुन खात्री केली पाहिजे.

<u>इंटरनेटवर नवीन बसपास / बसपासच्या नूतनीकरणासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे.</u>

1. बेस्ट उपक्रमाच्या वेबसाईट www.bestundertaking.com या पत्त्यावर भेट द्या.
2. नवीन बसपास तसेच बसपास च्या नूतनीकरणासाठी एक लिंक देण्यात आली आहे.
3. नवीन बसपास मिळण्याच्या उद्देशाने कृपया आवश्यक ती माहिती दिलेल्या जागी भरा.
4. काही अनिवार्य माहिती जसे की नाव, दूरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी, जन्मतारीख इ. भरल्याशिवाय पुढील माहिती भरता येणे शक्य होणार नाही.

5. जो पर्यंत बसपासवर विशिष्ट प्रक्रिया केली जात नाही तोपर्यंत प्रत्येकाला ईच्छीत बसपास विक्री केंद्र निवडून तेथुन बसपास मिळवू शकतात.

6. आपल्या स्थानिक फोटो गॅलरीमधून अलीकडील दृश्यमान पासपोर्ट आकाराचा फोटो निवडून बसपासवर मुद्रित करु शकतात.

7. बसपासचा नमुना आपल्या स्वीकृतीसाठी दर्शविला जाईल. कृपया पुढील कामकाज करण्याआगोदर त्यातिल तपशील पुन्हा सत्यापित करावा.
8. स्वीकृती झाल्यावर, बसपासचा प्रकार निवडण्यासाठी लिंक उपलब्ध केली जाईल.

9. आवश्यक बसपासची निवड झाल्यानंतर निर्दिष्ट केलेल्या शुल्कासह भरावयाची रक्कम प्रदर्शित केली जाईल.
10. कृपया क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंगद्वारे देय रक्कमेसाठी आपणास गेटवे देयक निर्देशित केला जाईल. कृपया लक्षात ठेवा की वित्तीय संस्था ज्याद्वारे पेमेंट केले जाते त्या त्यांच्या नियमांप्रमाणे स्वत:चे व्यवहार शुल्क लावू शकतात.

11. एकदा देय रक्कमेची पडताळणी झाली आणि स्वीकारली गेली की, आधीच नमुद केलेल्या ईमेल आयडीवर आपणास पावती पाठविली जाईल. देय रक्कमेसाठी एक तात्पुरती पावती दिली जाईल ज्या मध्ये जमा करण्याचे ठीकाण अपेक्षीत जमा करण्याची तारीख सारखा तपशील पावतीवर सुचित केला जाईल. कृपया ही पावती मुद्रित करुन बसपास स्विकृतीच्या वेळी ती दाखवणे आवश्यक आहे.
12. एकदा व्यवहार यशस्वी झाला की, कोणत्याही कारणास्थव तो रद्द करता येणार नाही.
13. जर दिलेल्या रक्कमेची कपात झाली आणि व्यवहार अयशस्वी झाला तर पेमेंट गेटवे ऑपरेटर (मेसर्स बिलडेस्क) यांच्या तर्फे प्रवाशांना त्यांच्या खात्यात सदर रक्कम जमा केली जाईल. अशा परिस्थितीत प्रवाशी pgsupport@billdesk.com वर लिहू शकतो.

14. कृपया पूर्वी निर्दिष्ट केलेल्या विक्री केंद्रावर तात्पुरत्या देण्यात आलेल्या पावतीसह भेट द्या. बसपासवरील मुद्रित केलेल्या तपशीलाची प्रतिनिधीद्वारे पुष्टी केली जाईल आणि बसपास सक्रिय केला जाईल. बसपास सक्रिय केल्याच्या तारखेपासून बसमध्ये निवडलेल्या पर्याया नुसार प्रवास करण्यासाठी वैध असेल.

15. कृपया बसपास ताब्यात घ्या आणि त्यातिल तपशील विक्री केंद्रावर असलेल्या मशीन मध्ये सत्यापित करा.

<u>इंटरनेटवर नुतनीकरण प्रक्रिया:</u>

1. कृपया बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com हया वेबसाइटला भेट द्या. बस पास समाप्ती तारखेपूर्वी 1 ते 7 दिवस अगोदर नूतनीकरण केले जाऊ शकते.

2. कृपया बसपास क्रमांक, जन्मतारीख आणि ई-मेल खाते तपशील प्रविष्ट करा.

3. स्क्रीनवर प्रदर्शित केल्याप्रमाणे आपल्याला सुरक्षा कोड पुन्हा विचारण्यात येईल.

4. यशस्वी भरण्यानंतर, एक ई-मेल आपल्या ई-मेल खात्यावर पाठविला जाईल, ज्यात एक वैध लिंक दिली जाईल. त्यावर क्लिक केल्यावर आपल्याला बसपास नूतनीकरण स्क्रीन साठी निर्देशित केले जाईल.

5. आपल्याला निर्दिष्ट तपशीलांमध्ये माहिती भरण्यास सांगितले जाईल ज्या मुळे इतर तपशील सक्षम होईल.
6. बसपासचा तपशील पडताळणी आणि पुष्टीकरणासाठी दर्शविला जाईल.
7. देय रक्कम म्हणजेच भाडे अधिक लागू होणारे शुल्क प्रदर्शित केले जातील.

8. कृपया क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंगद्वारे देय रक्कमेसाठी आपणास गेटवे देयक निर्देशित केला जाईल. कृपया लक्षात ठेवा की वित्तीय संस्था ज्याद्वारे पेमेंट केले जाते त्या त्यांच्या नियमांप्रमाणे स्वत:चे व्यवहार शुल्क लावू शकतात.

9. एकदा देय रक्कमेची पडताळणी झाली आणि स्वीकारली गेली की, आधीच नमुद केलेल्या ईमेल आयडीवर आपणास पावती पाठविली जाईल. देय रक्कमेसाठी तपशीलासह एक पावती दिली जाईल. कृपया ही पावती मुद्रित करुन बसपास सक्रीय करतेवेळी आमच्या बसवाहकाकडे किंवा विक्री केंद्रावर दाखवणे आवश्यक आहे.
10. सर्व प्रवाशांना आमच्या बसमधील कोणत्याही बसवाहकाकडून कार्ड सत्यापित करणे अनिवार्य आहे. बसवाहक बसपास ऑनलाईन नूतनीकरणाच्या 5 दिवसांनंतर बसपास प्रमाणित करू शकतो. त्यानंतर प्रवाशाला जवळच्या विक्री केंद्राला बस पास वैध करण्यासाठी भेट द्यावी लागेल.
11. कालबाह्यता तारखेपूर्वी कार्ड प्रमाणित केले असले तरी नूतनीकरणची तारीख समान राहील.
12. बसपासच्या प्रकारामध्ये किंवा कालावधीमध्ये करावयाच्या कोणत्याही बदलासाठी, प्रवाशाला विक्रीकेंद्राला भेट देणे आवश्यक आहे.

<u>आकारले जाणारे अपेक्षीत विविध शुल्क खालीलप्रमाणे आहे:</u>

1. नवीन बस पास जारी करण्यासाठीः रुपये 30/-
2. भाडे: बसपासच्या प्रकारावर आधारीत.
3. प्रशासकीय शुल्कः दरमहा रुपये 10/-

4. विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सहा महिन्यांपर्यंतच्या बसपाससाठी आकारण्यात आलेले प्रशासकीय शुल्क फक्त 5 महिन्यासाठी असेल.
5. दोषपूर्ण / क्षतिग्रस्त कार्डाच्या बदल्यात नवीन दुय्यम बसपास जारी करण्यासाठी शुल्क रुपये 30/- व प्रशासकीय शुल्क रुपये. 20/- आहे. जुन्या कार्डची वैधता 15 दिवसांपेक्षा जास्त असेल तर तो कालावधी नवीन कार्डावर हस्तांतरित केला जाईल.

6. हरवलेल्या बसपासच्या बदल्यात, देण्यात येणा-या बसपाससाठी दंड रुपये 100/- किंवा एकूण बसपास भाडेच्या 10% जे उच्चत्तम असेल ते शुल्क आकारले जाईल. ही रक्कम पुढच्या रुपये 10/ च्या पटीत पूर्ण केली जाईल. हया व्यतिरीक्त नव्या बसपाससाठी रुपये 30/- आणि प्रशासकीय शुल्क रुपये 10/ आकारले जाईल.

7. हरवलेल्या बसपासच्या बदल्यात, देण्यात येणा-या नवीन दुय्यम बसपाससाठी 1) पोलीस तक्रार, 2) फोटो ओळख पुरावा, आणि 3) उपक्रमाने जारी केलेली वैध पावती सादर करावी लागेल.

8. वरील शुल्कामध्ये आगाऊ सूचनेशिवाय कोणताही बदल होऊ शकतो.

<u>भाडे संरचना:</u>

| | सर्वसाधारण/मर्यादीत | | जलद | | वातानुकुलीत | |
|---|---|---|---|---|---|---|
| कि.मी. | प्रौढ भाडे (रु) | सवलत भाडे (रु) | प्रौढ भाडे (रु) | सवलत भाडे (रु) | प्रौढ भाडे (रु) | सवलत भाडे (रु) |
| 2 | 8.00 | 4.00 | 10.00 | 5.00 | 20.00 | 10.00 |
| 4 | 10.00 | 5.00 | 14.00 | 7.00 | 25.00 | 12.00 |
| 6 | 15.00 | 7.00 | 20.00 | 10.00 | 30.00 | 15.00 |
| 8 | 18.00 | 9.00 | 23.00 | 11.00 | 35.00 | 17.00 |
| 10 | 22.00 | 11.00 | 27.00 | 13.00 | 40.00 | 20.00 |
| 12 | 25.00 | 12.00 | 30.00 | 15.00 | 45.00 | 22.00 |
| 14 | 28.00 | 14.00 | 33.00 | 16.00 | 50.00 | 25.00 |
| 17 | 32.00 | 16.00 | 37.00 | 18.00 | 55.00 | 27.00 |
| 20 | 34.00 | 17.00 | 39.00 | 19.00 | 65.00 | 32.00 |
| 25 | 37.00 | 18.00 | 42.00 | 21.00 | 80.00 | 40.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 42.00 | 21.00 | 47.00 | 23.00 | 95.00 | 47.00 |
| 35 | 47.00 | 23.00 | 52.00 | 26.00 | 110.00 | 55.00 |
| 40 | 52.00 | 26.00 | 57.00 | 28.00 | 120.00 | 60.00 |
| 45 | 57.00 | 28.00 | 62.00 | 31.00 | 130.00 | 65.00 |
| 50 | 62.00 | 31.00 | 67.00 | 33.00 | 140.00 | 70.00 |

मुंबई महानगरपालिकेच्या मर्यादेपलिकडे प्रवास केल्यास मुलभुत भाडयावर अतिरिक्त रु. 1/- विना-वातानुकुलीत सेवांसाठी आणि रु.5 /- वातानुकुलीत सेवांसाठी आकारले जाईल.

वरील प्रौढ भाड्यामध्ये पोषण अधीभाराची रक्कम 15 पैसे समाविष्ठ आहे
सामान भाडे संबंधित प्रौढ भाड्याच्या बरोबरीचे असेल, साधारण / मर्यादित सेवांसाठी जास्तीत जास्त सामान भाडे रुपये 34/-, जलद सेवांसाठी जास्तीत जास्त सामान भाडे रुपये 39/-, आणि वातानुकुलीत सेवांसाठी रुपये 65/- आहे.
“ स्वेच्छेनुसार प्रवासा ” साठी बसपास

| ठरावीक मुल्य बसपास | दैनंदिन (रु.) | मासिक (रु.) | त्रैमासिक (रु.) |
|---|---|---|---|
| शहर विना वातानुकुलित | 50 | 1100 | 3300 |
| उपनगर विना वातानुकुलित | 60 | 1320 | 3960 |
| विना वातानुकुलित सर्वत्र | 90 | 1980 | 5940 |
| वातानुकुलित दैनंदिन बसपास | 200 | 4400 | |
| बालक शहर विना वातानुकुलित | 25 | | |
| बालक उपनगर विना वातानुकुलित | 30 | | |
| बालक मॅजिक विना वातानुकुलित | 45 | | |
| बालक मॅजिक वातानुकुलित | 100 | | |

| अ.नु. | नाव | सोमवार ते शनिवार वेळ | रविवार वेळ |
|---|---|---|---|
| 1 | अंधेरी (पु) आगरकर चौक | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 2 | अंधेरी स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 3 | आणिक डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 4 | अणुशक्ती नगर | 7.00 ते 19.00 | बंद |
| 5 | बॅकबे डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 6 | वांद्रा कॉलनी बस स्थानक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 7 | वांद्रा डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 8 | वांद्रा स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 9 | चेंबुर/आंबेडकर उद्यान बस स्थानक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 10 | चेंबुर कॉलनी | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 11 | कुलाबा डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 12 | कॉ. पि.के. कुरणे चौक / दुरदर्शन | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 13 | सि.एस.टी/ भाटीयाबाग | 7.00 ते 19.00 | बंद |
| 14 | देवनार डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 15 | धारावी डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 16 | दिंडोशी डेपो | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 17 | घाटकोपर (प) रोड नं. 4 बसचौकी | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 18 | घाटकोपर बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 19 | घाटकोपर डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 20 | गोराई डेपो | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 21 | गोरेगाव डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 22 | गोरेगाव स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 23 | गोरेगाव स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 24 | हुतात्मा चौक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 25 | जे. मेहता रोड | 7.00 ते 19.00 | बंद |
| 26 | जुहू बस स्थानक | 7.00 ते 19.00 | बंद |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | कांदीवली स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 28 | कांदीवली स्टेशन(प) कमला नेहरु बस चौकी | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 29 | कांजुरमार्ग स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 30 | कुर्ला स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | बंद |
| 31 | कुर्ला स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 32 | मागाठणे डेपो | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 33 | महेश्वरी उद्यान | 7.00 ते 19.00 | बंद |
| 34 | माहिम बसस्थानक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 35 | मजास डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 36 | मालाड (पू) / पोद्दार पार्क | 7.00 ते 19.00 | बंद |
| 37 | मालाड (प) / कस्तुरबा रोड बसचौकी | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 38 | मालाड बस डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 39 | मालवणी/ गायकवाड नगर बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 40 | मरोळ डेपो | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 41 | माझगाव / महाराणा प्रताप चौक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 42 | मुलुंड (प) चेकनाका बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 43 | मुलुंड डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 44 | मुलुंड स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 45 | मुंबई सेंट्रल डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 46 | म्युझीयम/ डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी चौक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 47 | नाडकर्णी पार्क (वडाळा- पू) | 7.00 ते 19.00 | बंद |
| 48 | ओशिवरा डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 49 | पोईसर डेपो | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 50 | प्रतिक्षा नगर डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 51 | पंडीत पलुस्कर चौक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 52 | सांताक्रुझ डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 53 | सांताक्रुझ स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | 7.00 ते 19.00 |
| 54 | सिप्स् बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 55 | शिवडी / प्रबोधनकार ठाकरे उद्यान | 7.00 ते 19.00 | बंद |
| 56 | शिवाजी नगर बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 57 | शिवाजी पार्क / राम गणेश गडकरी चौक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 58 | सायन / राणी लक्ष्मीबाई चौक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 59 | ताडदेव / वसंतराव नाईक चौक | 7.00 ते 19.00 | बंद |
| 60 | वाशी बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 61 | विद्याविहार स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | बंद |
| 62 | विक्रोळी डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 63 | विक्रोळी स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | बंद |
| 64 | वडाळा (पू) / नाडकर्णी पार्क | 7.00 ते 19.00 | बंद |
| 65 | वडाळा डेपो | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 66 | वरळी डेपो | 7.00 ते 19.00 | बंद |
| 67 | वरळी गाव | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 68 | बोरीवली स्टेशन (पू) | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 69 | वांद्रा (पू) बस स्थानक | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |
| 70 | भायखळा स्टेशन (प) | 7.00 ते 19.00 | 9.00 ते 16.00 |